# अनुसूचित जातीतील चळवळीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रस्तुतता

**उषादेवी ईश्वरा चौधरी**, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

---

**प्रस्तावना**

'ऋग्वेद', 'मनुस्मृती', 'शतपथ ब्राह्मण,' 'रामायण', 'महाभारत', इ. ग्रंथ अभिजात साहित्यातील प्रमाणभूत ग्रंथ मानले गेले आहेत. जगामध्ये सर्वत्र धर्माचे पालन करण्यासाठी शिस्तीसाठी धर्मग्रंथांना प्रमाण मानले आहे, सर्वश्रेष्ठ गणले गेले आहेत. ज्यावेळी समाजात एखाद्या घटकावर अन्याय होतो त्यावेळी त्याचे चळवळ किंवा क्रांतीत रूपांतर होत असते. समाजाचा आरसा ज्या पद्धतीने साहित्यातून दिसून येत असतो, ज्याप्रमाणे समाजातील मानवी व्यवहार साहित्यातून प्रतिबिंबित होतात, त्याचप्रमाणे कोणत्याही क्रांतीचा आणि चळवळीचा महत्त्वाचा घटक म्हणजे त्याची विचारसरणी (Ideology) ही होय. एखाद्या विचारधारेवर एखादी संघटना चळवळ उभी राहत असते. ज्याप्रमाणे 'मनुस्मृति', 'भगवद्गीता', 'महाभारत', 'ऋग्वेद' या ग्रंथांनी भारतीय समाजाचे व्यवस्था बळकट केली, त्याचप्रमाणे 'अस्पृश्य', 'शूद्र पूर्वी कोण होते'? यासारख्या ग्रंथांनी त्यापूर्वीचा ग्रंथाचा अभ्यास करून विश्लेषण मांडून समाजाचा फोलपणा बाबासाहेबांनी विस्तृतपणे मांडलेला आहे.

भारतीय अभिजात साहित्यात 'रामायण', 'महाभारत' या महाकाव्यासोबत 'ऋग्वेद', 'मनुस्मृती', यासारख्या वेदांचा भागवतगीतेसारखाच धार्मिक ग्रंथ असा मान आहे. भारतीय समाजाने या ग्रंथांनाच प्रमाण मानून धर्माच्या आणि समाजाची आखणी केली. काळानुरूप या अभिजात साहित्यात या ग्रंथाच्या आधारे इतर साहित्याची निर्मिती केली गेली. समाजाची निर्मिती विशेषतः जातीव्यवस्थेची चौकट ज्या पद्धतीने निर्माण झाली या सर्व ग्रंथांना प्रमाण मानण्यात आलेला आहे. त्यामुळेच या ग्रंथांचा बाबासाहेबांनी सखोल अभ्यास केला होता. या साहित्याचा पुन्हा एकदा 'अस्पृश्य' या ग्रंथाच्या आधारे आढावा घेणे गरजेचे आहे.

**अभिजात साहित्य**

भारतीय अभिजात साहित्यात अनेक वेध महाकाव्य, नाटक, ग्रंथ यांचा समावेश केला जातो. या संशोधन निबंधात ऋग्वेद, महाभारत या अभिजात साहित्यासोबत 'शूद्र पूर्वी कोण होते?' आणि 'अस्पृश्य' या दोन ग्रंथांचा अभिजात साहित्याच्या दृष्टिकोनातून अभ्यास केला गेला आहे. प्रथम अभिजात साहित्याविषयीचे निकष समजून घेणे महत्त्वाचे आहे. काळाच्या कसोटीवर जे साहित्य तितकेच मार्गदर्शक प्रेरणादायी म्हणून उतरले असते. ज्याच्यामध्ये कालजयी मूल्ये, सार्वत्रिक सत्य सांगितले असतात अशा ग्रंथांना साहित्याला अभिजात साहित्य म्हटले जाते. या साहित्याच्या वाचनाने वाचकाच्या विचार प्रक्रियेत कायमस्वरूपी बदल होत असतो. मुलतः या साहित्याचा दर्जा मांडणी अत्यंत सखोल तर्कशुद्ध संशोधनावर आधारित असते. यामध्ये भाषेची भव्यता, सखोल विचार यासोबतच मानवी मूल्ये, स्वातंत्र्य, बंधुता यांना मध्यवर्ती स्थान असते. अभिजात साहित्य अत्यंत प्राचीन परंपरेवर आधारित प्राचीन संस्कृती आणि मूल्यांचे स्वरूप दर्शविणारे असते. डॉ. बाबासाहेबांची ग्रंथसंपदा फक्त अनुसूचित जातीच्या चळवळीला प्रेरणा देणारी नाहीत तर त्यापुढे जाऊन नेमका समाज कसा तयार झाला, मानवी गुलामीची साखळी कशी तयार झाली आणि आजच्या काळात अजूनही बरेचसे प्रश्न सुटलेले नाहीत त्याची उत्तरे देणारी आहेत.

अनुसूचित समाजाच्या चळवळीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अर्ध्वयू मानले जाते. बाबासाहेब फक्त महान राजकारणी किंवा कायद्याचे विचारवंत नव्हते, तर ते एक महत्त्वाचे लेखक, संशोधक, अभिजात साहित्यिक तसेच क्रांतीकारक वैचारिक बदल मांडणारे तर्कदृष्टीत साहित्याला निर्माण करणारे लोकशाही मूल्यांचे भाष्यकार होते. ज्या काळात त्यांचा जन्म झाला त्यावेळी भारतातील अनुसूची समाजाची परिस्थिती फारच बिकट होती. या बिकट परिस्थितीत धीराने तोंड देत बुद्धिमत्ते ने मार्गक्रमण करत बाबासाहेबांचा प्रवास एक अनुसूचित जातीचा संघर्ष ते स्वतंत्र भारताचे कायदामंत्री असा राहिला आहे. बुद्धिमत्ता कधीच दडपून राहत नाही. समाजातील अन्याय परिस्थिती असली तरी मनुष्याला त्याची बुद्धिमत्ता हुशारी विचारांची सखोलता परिश्रम कुठवर नेऊ शकते याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे डॉ. भीमराव आंबेडकर. यांचे वैचारिक उंची त्यांच्या प्रत्येक साहित्य कृतीतून दिसून येते. त्यांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता', 'प्रबुद्ध भारत' या नियतकालिके वृत्तपत्रे यातून केलेले लिखाण हे मराठी साहित्यातील वैचारिक गद्याचा उच्चांक मानले जातात.

**ग्रंथांचे महत्त्व**

1940 च्या दशकात जेव्हा भारत स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर होता त्यावेळी भारतात असंख्य प्रश्न समाजापुढे उभे होते. भारतीय समाजामध्ये त्यावेळी हिंदू धर्मात सवर्ण, अस्पृश्य यासोबत शूद्र म्हणजेच ओबीसी हा एक मोठा वर्ग असे अनेक तुकडे पडलेले होते. या सर्व समाजाला स्वतंत्र भारतात त्यांचा त्यांचा अधिकार हक्काचा वाटा देणे महत्त्वाचे होते. त्यावेळी काही पाश्चात्य विचारवंतांच्या मते, संशोधकांच्या मते आर्य हे उच्चवर्णीय आणि द्रविड किंवा दास हे शूद्र किंवा अनार्य वंशाचे आहेत असा दावा करण्यात आला होता. या सर्व प्रश्नांचा मागोवा घेणे भारतीय समाजात समाजातील प्रत्येक घटकांना न्याय मिळवून देणे यासाठी संशोधन पर लिखाण करणे क्रमप्राप्त होते. यासाठी प्रथम बाबासाहेबांनी 'शूद्र पूर्वी कोण होते' आणि नंतर 'अस्पृश्य' हा ग्रंथ लिहिला.

**शूद्र पूर्वी कोण होते? (Who Were Sudras?)**

1946 मध्ये त्यांनी या ग्रंथाच्या आधारे शूद्र पूर्वी क्षत्रिय म्हणजेच आर्य होते हे सप्रमाण सिद्ध केले आहे. बाबासाहेबांनी ग्रंथाच्या सुरुवातीला ऋग्वेदातील आणि महाभारतातील संदर्भ देत सुदास आणि पैजवान अथवा पजवान या राजांचा उल्लेख केला आहे. सुदास आणि पैजवान या दोन्ही क्षत्रिय घराण्यातील राजांनी आणि ब्राह्मण यांच्यामध्ये मोठा संघर्ष वेळोवेळी झाला. ज्यामध्ये त्यांनी ब्राह्मणांना हरवून त्यांच्यावर अत्याचार केले असे वर्णन केले गेले आहे. ब्राह्मणांकडून उपनयन नाकारले. लढाईत हरवले आणि काही ठिकाणी ब्राह्मण समाजावर अत्याचार केले. यातून ब्राह्मणांकडून या स्थितीचा बदला घेण्यासाठी ब्राह्मणांनी या क्षत्रिय गटाचे उपनयनविधी नाकारून धार्मिक अस्त्र उभारले. प्राचीन हिंदू धर्मानुसार उपनयन विधीशिवाय शिक्षण घेणे आणि संपत्तीचा साठा करणे या दोन्ही गोष्टीचा समाजातील कोणत्याच व्यक्तीला अधिकार नव्हता. सदर विशिष्ट क्षत्रियांचे उपनयन नाकारल्यामुळे समाजात त्यांचा दर्जा घसरला आणि ते क्षत्रिय वर्णातून चौथ्या वर्णनात ढकलले गेले. अशा प्रकारे शूद्र वर्ण अस्तित्वात आला. या ग्रंथात बाबासाहेबांनी 'ऋग्वेद' महाभारतातील 'शांतीपर्व' असेच'स्मृतीग्रंथा'तील संदर्भ सांगितलेले आहेत.

**अस्पृश्य (The Untouchables)**

'शूद्र पूर्वी कोण होते?' या ग्रंथाचा उत्तरार्ध म्हणून 'अस्पृश्य' या ग्रंथाला ओळखले जाते. सदर ग्रंथात एकूण सहा भागातून अस्पृश्यतेची मूळ कारणे हिंदू धर्मातील अस्पृश्यता यासोबतच 'विखुरलेले लोक', 'कर्मवीपाक सिद्धांत', बौद्ध धर्मातील विचार, इ. महत्त्वाच्या संकल्पनेवर विस्तृत मांडणी केली आहे. ग्रंथाच्या सुरुवातीस जगामध्ये विविध संस्कृतीमध्ये अस्पृश्यता नेमकं कोणत्या कारणासाठी पाळली जात होती हे सांगितले आहे.

या ग्रंथात 'टोळीयुद्ध' आणि 'विखुरलेले लोक' (Broken Men) या संकल्पना सांगितले आहेत. जेव्हा दोन टोळीत युद्ध होत होते तेव्हा पराभूत झालेल्या टोळीवर आता अतोनात अत्याचार केले जात होते. त्यांचे अस्तित्व नष्ट करण्याचा प्रयत्न केला जात होता. या पराभूत टोळीतले वाचलेले लोक आश्रयासाठी अथवा लोकलज्जे खातर इतरत्र विखुरलेले होते यांनाच विखुरलेले, हरलेले, पराभूत लोक (Broken Men) असे ओळखले जात होते. नंतरच्या काळात या समाजाने विजयी किंवा स्थिर समाजासोबत संरक्षणासाठी किंवा जगण्यासाठी म्हणून अलिखित करार केला. यानुसार पराभूत लोकांनी स्थिर समाजाचे गावाबाहेर पेशीबाहेर राहून संरक्षण करावयाचे आणि त्या बदल्या त्यांना गावाकडून अन्न आणि राहण्यासाठी जागा द्यायची असे ठरले. हा समाज दुसरा टोळीतील होता. तसेच संरक्षणासाठी त्यांना नेमले असल्यामुळे आलेल्या शत्रूला प्रथम पुढे जाऊन प्रतिकार करणे सोयीचे व्हावे यासाठी त्यांची सोय गावाबाहेर केली गेली. ते परक्या टोळीतले होते म्हणून 'उपरा' आणि गावातल्या टोकाला राहत होते म्हणून 'अंत्यज' अशी संबोधने कालानुसार त्यांना प्राप्त झाली. ज्याचा पुढे संकल्पनेचा अपभ्रंश करून त्यांना पूर्णपणे वाळीत टाकले गेले.

कालांतराने या अस्पृश्य समाजाने बौद्ध धर्म स्वीकारला. ब्राह्मणवादाला विरोध केला. कालानुसार या समाजाची परिस्थिती खालावत गेली त्यामुळे, गावाकडून अन्नाची पूर्तता त्या प्रमाणात होत नसल्याने पशुमांस खाण्यास सुरुवात केली. पुढे त्यांच्यावर मृत पशुचे मांस खाण्याची वेळ आली. या सर्व स्थित्यंतरामुळे मुख्य समाजाने त्यांना पूर्णपणे अस्पृश्यतेचा शिक्का मारून बहिष्कृत केले गेले. म्हणजे आधी ते फक्त (Broken Men) हरलेले, विखुरलेले होते नंतर ते अस्पृश्य म्हणून गणले जाऊ लागले.

**शूद्र आणि अस्पृश्य संकल्पनेतील फरक**

सदर दोन ग्रंथांच्या आधारे सर्व संदर्भ ग्रंथांच्या विश्लेषणानुसार शूद्र म्हणजे चातुर्वर्ण व्यवस्थेचा भाग असून ते गावात राहत होते. परंतु उपनयन नाकारल्यामुळे समाजात दर्जा खाली घसरला होता आणि अस्पृश्य म्हणजे चातुर्वर्ण

व्यवस्थेच्याही बाहेरचे ज्याला बाबासाहेबांनी पंचम वर्ण असे संबोधले आहे. जे गावाबाहेर राहतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शूद्र हे सवर्ण हिंदू आहेत तर अस्पृश्य हे अवर्ण म्हणजेच वर्णाबाहेरील आहेत.

**कर्मविपाक सिद्धांत**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शूद्र आणि अस्पृश्य या दोन्ही ग्रंथांच्या आधारे अनुसूचित जातींचा संघर्ष हा मुख्यकरून ब्राह्मण आणि बौद्ध या द ोहोतील ऐतिहासिक संघर्षाचा परिपाक असल्याचे सांगितले आहे. परंतु सनातन धर्मामध्ये कर्मविपाक सिद्धांताला महत्व दिले गेले आहे. या सिद्धांतानुसार समाजातील प्रत्येक व्यक्तीची सामाजिक आणि आर्थिक योग्यता किंवा स्थिती ही त्यांच्या पूर्वजन्मीच्या केलेल्या कृत्याचे फळ असते. म्हणजेच सनातन धर्मानुसार पूर्वजन्मीच्या केलेल्या पापामुळे एखाद्या व्यक्तीचा अस्पृश्य किंवा शूद्र समाजात जन्म होतो असे मानले जाते. म्हणजेच मुख्य समाजाने एखाद्या मानलेल्या कल्पनेला धार्मिक अधिष्ठान देऊन इतर समाजाच्या मनात स्वतः विषयी खुजेपणा, न्यूनगंडसोबत राग येण्याच्या ऐवजी भीती निर्माण केली. या सिद्धांतामुळे लोकांच्या मनात खुजेपणासोबत न्यूनगंड निर्माण झाल्यामुळे अन्यायाला प्रतिकार करण्याचे वृत्ती मारून टाकली गेली आणि मुख्य समाजाकडून या समाजावर शतकानू शतके मानसिक गुलामगिरी झोपवण्यात आली. कर्मविपाक सिद्धांतामुळे अस्पृश्यतेला दैवी स्वरूप दिले गेले. बाबासाहेबांनी हा सिद्धांत खोडून टाकला आणि अस्पृश्यतेला धर्माच्या चौकटीतून काढून टाकून त्याला समाजशास्त्राच्या ऐतिहासिक दृष्टिकोनाच्या मांडणीत बसवले.

**क्रांती- प्रतिक्रांती (Revolution- Anti Revolution)**

बाबासाहेबांच्या मते ज्यावेळी समाजाबाहेरी लोकांवरील अत्याचार वाढले आणि त्यांनी बौद्ध धम्माचा आश्रय घ्यायचे ठरवले. ही घटनाच क्रांतीच्या मुळाशी होती. भगवान बुद्धांनी तात्कालीन परिस्थितीत मानवतावादाला महत्त्व देत नवीन धर्माची पायाभरणी केली ज्याच्यामध्ये मानवतावाद, विज्ञानवाद, समता आणि न्यायाला महत्त्व होते. या समाजाने क्रांतीचे पाऊल टाकत चातुवर्ण्य व्यवस्था नाकारली आणि बौद्ध धर्म स्वीकारला. अनुयायांनी सर्वत्र समता आणि न्याय प्रस्थापित केला. या काळात ब्राह्मणांचे वर्चस्व नष्ट झाले होते. पुढे जाऊन पुश्यमित्र शृंगाच्या काळात ब्राह्मणांनी प्रतिक्रांतीची आखणी करून पुन्हा भारतीय समाजावर वर्चस्व प्रस्थापित केले त्यांनी बौद्ध धम्म नष्ट करण्याचा प्रयत्न केला आणि समाजात पुन्हा ची परत बसवली. यावेळेस त्यांनी मनुस्मृतीची निर्मिती करून त्याला संदर्भ बनवून या पिछाडलेला समाजावर गुलामगिरी आणि अस्पृश्यता लादण्यात आली. यातील महत्त्वाचा मुद्दा गोमांस भक्षणाचा येतो. पूर्वी ब्राह्मण यज्ञासाठी पशुबली देत होते. परंतु प्रतिक्रांतीनंतर त्यांनी गोमास भक्षण निशिद्ध सांगून शाकाहार अवलंबिला. पराजित समाज मांस भक्षण करत राहिला, त्यामुळे त्यांना अस्पृश्य ठरवून बहिष्कृत केले गेले.. डॉ. बाबासाहेबांचा हा ग्रंथ (क्रांती म्हणजेच बौद्ध धम्म) आणि प्रतिक्रांती (मन ूवाद) यांच्यातील झालेल्या संघर्षाचा दस्तऐवज आहे.

**त्रिगुण संकल्पना**

प्राचीन काळामध्ये 'मनुस्मृती', 'गीता' यासारख्या हिंदू धर्मग्रंथांनी समाजाच्या चातुवर्ण्य व्यवस्थेचे समर्थन करण्यासाठी 'गुण- कर्म- विभागश' हा सिद्धांत मांडला. त्यामध्ये प्रस्थापितांनी असा दावा केला गेला की,

ब्राह्मण = सत्वगुण (ज्ञान पावित्र्य प्रकाश)

क्षत्रिय = रजोगुण (क्रियाशीलता जिद्द अहंकार)

शूद्र = तमोगुण (अज्ञान आळस अंधार)

सत्व (Sattva) रज (Rajas) तम (Tamas)

वरील विश्लेषणाचा आधार घेऊन तात्कालीन ग्रंथकारांनी चातुवर्ण्य व्यवस्था नैसर्गिक असल्याची बतावणी केली. त्रिगुणावरून ज्याचा जो गुण त्याचा तो वर्ण असा युक्तिवाद लढविला गेला.

बाबासाहेबांनी यावर आक्षेप घेत 'शूद्र पूर्वी कोण होते?' मध्ये अनुवंशिकतेवर प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नानुसार ब्राह्मणाचा मुलगा कायम सत्त्वगुणीच कसा निघेल, याची खात्री कशी असू शकते, असा सवाल उपस्थित केला. या ग्रंथात त्रिगुणाचा आधार घेत शोषितांनी इतर समाजाला तमोगुणी ठरवून 'अस्पृश्या'चा शिक्का मारला आणि यातूनच त्यांना ज्ञान आणि विकास सोबतच धनसंचय यापासून वंचित करण्यात आले. 'अस्पृश्य' मध्ये बाबासाहेबांच्या मते जे 'भरकटलेले लोक' होते ते मुलता लढाऊ आणि स्वतंत्र प्रवृत्तीचे म्हणजेच रज ोगुणी होते. परंतु प्रतिक्रांतीच्या काळात त्यांच्यावर अधमी तमोगुणी असल्याचा धार्मिक शिका मारला आणि या समाजाला बहिष्कृत करण्यात आले.

या त्रिगुण संकल्पनेवर आधारित मानसिक गुलामगिरी हटविण्यासाठी बौद्ध धम्मातील 'शील' ही संकल्पना नव्याने समाजासमोर मांडली आणि मनुष्याची योग्यता, किंमत किंवा गुण हे कर्माने आणि चारित्र्याने ठरतात हे विस्तृत केले.

**राजकीय षडयंत्र**

बाबासाहेबांनी या दोन्ही ग्रंथाच्या आधारे वेळोवेळी सूत्रांची निर्मिती पतन किंवा अस्पृश्यतेचे कारणे हे निसर्गनिर्मित प्रक्रिया नसून जाणीवपूर्वक प्रस्थापित समाजाकडून रचले गेलेले कारस्थान होते हे सिद्ध केले आहे. सुदास आणि ब्राह्मणांच्यातील संघर्ष हा मुद्दा फक्त धार्मिकतेचा नव्हता तर सत्तेचा नियंत्रणाचा मुद्दा होता यातूनच उपनयनावरून एका समाजाकडून दुसऱ्या समाजाला रोखण्यात आले आणि कित्येक शतके विलग टोळ्यांवर गुलामगिरी थोपवण्यात आली. या सर्व राजकारणात धर्माचा ग्रंथांचा आधार हत्यारे म्हणून वापरण्यात आला. 'मनुस्मृती' सारख्या राजकीय संविधानाच्या आधारे प्रस्थापितांकडून इतर समाजाचे जगण्याचे सर्वच अधिकार कायद्याच्या नावाखाली काढून घेण्यात आले.

**चळवळीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रस्तुतता**

1. **अस्मितेचा शोध आणि न्यूनगंडाचा त्याग**

अनुसूचित जातीच्या चळवळी पुढे सर्वात मोठा प्रश्न हा स्वतःची ओळख शोधणे आणि शतकांनो शतके लादलेली मानसिक गुलामगिरीची कारणे ओळखून ती नाकारणे हा आहे. या दोन्ही ग्रंथाच्या आधारे बाबासाहेबांनी समाजाची स्वतंत्र विचाराची पराक्रमी ओळख जगासमोर मांडली. ते अधमी किंवा पापी हे फक्त प्रस्थापितांच्या दृष्टिकोनातूनच होते हे सिद्ध केले. या सिद्धतेमुळे चळवळीतील न्यूनगंड मिटण्यास मदत होईल आणि आत्मभान प्राप्त होण्याची संभावना वाढते.

2. **राजकीय सत्तेची अनिवार्यता**

बाबासाहेबांनी अस्पृश्यता जाणून बुजून समाजावर लादलेली होती हे सर्व प्रमाण सिद्ध केले आहे. त्यांच्या मते अनुसूची समाजाच्या मनात अस्पृश्यतेची भावना बळावून ठेवली, ज्याने त्यांनी प्रस्थापित समाजासोबत विकासाचा न्यायाचा किंवा संपत्तीचा वाटा मागू नये. ज्यावेळी प्रस्थापित समाजाची मखलाशी लक्षात येईल तेव्हा अनुसूचित समाजाला हेही लक्षात येईल की आपल्याला फक्त आर्थिक आणि सामाजिक नव्हे तर त्याही पुढे जाऊन राजकीय सत्तेत प्रतिनिधित्व मिळवणे महत्त्वाचे आहे.

3. **वैज्ञानिक आणि तर्कशुद्धता**

बाबासाहेबांनी अनुसूचित समाजाच्या उदाहरणासाठी 'अस्पृश्य' या ग्रंथात सर्व तर्काचा विज्ञानाचा आधार घेऊन रक्तचाचण्या आणि शरीर शास्त्रीय संदर्भ देखील उलगडून सांगितले आहे. वैज्ञानिकदृष्ट्या सर्व जातीय श्रेष्ठत्वाचे तर्क फोल ठरतात.

4. **जागतिक स्तरावरील मानवी हक्कांचा प्रश्न**

आजच्या काळात अनुसूचित जातीची चळवळ ही फक्त एका जातीय प्रश्नावर बोट ठेवत नसून जगातील सर्वच वंशवादाच्या विरोधात लढा देताना दिसत आहे. ही चळवळ स्थानिक प्रश्नावरून आंतरराष्ट्रीय स्वरूपापर्यंत पोहोचलेली आहे. बाबासाहेबांनी मुळातच या प्रश्नाकडे मानवी मूल्यांच्या दृष्टिकोनातून बघितले आणि या ग्रंथांची मांडणी केली होती. आज ही संयुक्त राष्ट्रात सारख्या जागतिक स्तरावरील वार्षिक भेदभावावर ज्यावेळी चर्चा केली जाते त्यावेळी या ग्रंथातील संदर्भ प्रमाण मानले जातात.

**५. अनुसूचित जातीतील चळवळीचा जागतिक दृष्टिकोन**

भारतात ज्या पद्धतीने अनुसूचित जातीतील प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी कित्येक वर्षे चळवळ सुरू आहे त्याच धर्तीवर जागतिक स्तरावर अनेक ठिकाणी अनेक देशांमध्ये चळवळी सुरू आहेत.

**अ. सिविल राइट्स मुव्हमेंट**

भारतात ज्याप्रमाणे वर्णभेद वांशिक भेद केला जातो त्याप्रमाणे अमेरिकेत देखील अशाच प्रकारचा भेदभाव कृष्णवर्णी यांच्या संदर्भात केला जातो. या अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी प्रमुख कृष्णवर्णीय नेते मार्टिन ल्युथर किंग ज्युनियर यांनी कित्येक वर्ष लढा दिला. मार्टिन ल्युथर किंग यांची चळवळ गांधीजींच्या अहिंसेच्या धरतीवर आधारित होती. तत्पूर्वी अमेरिकेत कृष्णवर्णी यांना सर्व ठिकाणी भेदभाव केला जात होता. त्यांना मतदानाचा अधिकार देखील नव्हता मार्टिन ल्युथर किंग यांच्या अथक प्रयत्नानंतर भारतातील राज्यघटनेच्या कित्येक काळानंतर १९६४ मध्ये नागरी हक्क कायदा करण्यात आला, त्याद्वारे कृष्णवर्णीयांना समान हक्क देण्यात आले.

**ब. ब्लॅक पॅंथर**

मुव्हमेंट महाराष्ट्रात जी दलित पॅंथर संघटना स्थापन झाली तिचा आधार अमेरिकेतील नुकतीच १९६६ मध्ये स्थापन झालेली ब्लॅक पॅंथर पार्टी ही संघटना होती. या दोन्ही संघटना आपापल्या ठिकाणी आक्रमकपणे कार्य करणाऱ्या होत्या. ही न्यूटन आणि बॉबी सील यांनी ही संघटना मुख्य करून कृष्णवर्णी यावर अमेरिकेतील पोलीस यंत्रणे कडून केल्या जाणाऱ्या अत्याचाराला प्रतिकार करण्यासाठी स्थापन केली होती.

**क. अँटी अपार्थईड चळवळ**

ही चळवळ दक्षिण आफ्रिकेत वंश भेदाला विरोध करण्यासाठी चालवली गेली. 'अपार्थईड' म्हणजे वंश भेदावर आधारित सरकारी धोरण. ज्याप्रमाणे भारतात अस्पृश्य लोकांना गावाबाहेर राहण्याची सक्ती केली जात होती त्याप्रमाणे दक्षिण आफ्रिकेतील कृष्णवर्णी यांना राहण्यासाठी वेगळ्या वस्तीची सोय केली जात होती. तेथे कृष्णवर्णीयांचे 'विलगीकरण' केले जात होते. या सामाजिक अन्यायाविरोधात नेल्सन मंडेला यांनी आजीवन लढा दिला.

**ड. बुराकूमीन चळवळ**

ज्याप्रमाणे भारतात चर्म आणि चर्मोदयोगावर आधारित समाजातील लोकांना बहिष्कृत करून विचारलेला समाजात ढकलून दिले. त्यांना अपवित्र घोषित करून विकासाच्या सर्व संधी हिरावून घेतल्या गेल्या. त्याचप्रमाणे जपानमध्ये बुराकूमीन हा समूह जो ऐतिहासिक काळापासून मृत जनावरे उचलून आणणे आणि चर्मोद्योग करत होता त्यांना अपवित्र मानून त्यांच्या मुख्य प्रवाहापासून इतरत्र ठेवले गेले. ज्याप्रमाणे भारतातील अनुसूचित जातीतील ढोर आणि चांभार समाजाला मुख्य समाजातून बहिष्कृत केले गेले तसेच बुराकूमीन समाजाला सुद्धा बहिष्कृत केले होते या समाजातील नेते साईको मानकीची यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी १९२२ च्या दरम्यान 'लेव्हलर्स सोसायटी' किंवा 'नॅशनल सुईहेईशा' नामक संघटनेची स्थापना करून या अन्यायाविरुद्ध आवाज उठवला आणि जपान मधील सर्व समाजाला सन्मानाने जगण्याचा अधिकार मागितला. यावर १९६९ मध्ये जपान सरकारने बुराकूमीन साठी विशेष उपाययोजना कायदा लागू करून या समाजाला राहणीमान सुधारण्यासाठी अनेक सवलती मिळवून दिल्या ही चळवळ आजही गुप्त पद्धतीने लढवली जात आहे. १९७०-८० च्या दशकात तेथील बुराकूमीन नेत्यांनी भारतातील अनुसूचित जातीच्या नेत्यांची भेट घेतली होती आणि दोघांनी मिळून IMADR (international movement against all forms of discrimination and racism)या जागतिक संघटनेची स्थापना केली होती.

**ई. नेपाळमधील दलित चळवळ**

नेपाळमध्ये सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता बळकट होत गेली १८५४ मध्ये अधिकृत 'मुलुकी ऐन' कायदा करून जातियव्यवस्थेचे बळकटीकरण केले गेले. त्यामुळे तेथील कामी, दमाई, सार्की सारख्या दलित जाती मुख्य प्रवाहापासून सामाजिक, आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या पिछडलेल्याच राहिल्या गेल्या. येथील चळवळीवर बाबासाहेबांच्या विचारांचा प्रचंड प्रभाव आहे. तेथील चळवळी देखील बाबासाहेबांच्या विचारांच्यावरच आधारलेले आहेत. 'सर्वजन समाज' आणि 'नेपाळ समाज सुधारक' या इत्यादी संघटनांनी तेथील दलितांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य केले. २०१५ मधील नवीन संविधानात दलितांना समान हक्क आणि आरक्षण देण्यात आले. तेथे दरवर्षी मोठ्या प्रमाणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी केली जाते. तेथील चळवळ आजतगायत सुरू असून दलित मुक्ती मोर्चा सारख्या संघटना दलितांच्या हक्कासाठी त्यांचा प्रभाव वाढवण्यासाठी आणि प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करत आहेत.

आजअखेर अनुसूचित समाजाचे साहित्य हे आंबेडकरी साहित्य असे ओळखले जात असले तरी त्याचे प्रेरणास्थान बाबासाहेबांचे विचार साहित्य आहे. यात मानवतावादी मुल्येसोबत मनुष्य आणि त्यांच्या यातना यांना केंद्रबिंदू मानून लिखाण केले जाते. या लिखाणात भारतीय समाजाची बेगडी, पांढरपेशी चौकट नाकारून अनेक विदारक सत्य या लेखनातून बाहेर पडत असते. बाबासाहेबांच्या लिखाणात वैज्ञानिक दृष्टिकोन, प्रश्न मांडणी, पुराव्यासहित विश्लेषण आणि निष्कर्ष अशी मांडणी असते. त्यासोबतच भाषाशैली प्रवाही धारदार बुद्धीला आवाहन देणारी असते. त्यांच्या लेखनातून मराठी, इंग्लिश सोबत संस्कृत आणि पाली भाषेचाही व्यासंग दिसून येतो. 'शूद्र' आणि 'अस्पृश्य' सोबत 'थॉट्स ऑन पाकिस्तान' यासारख्या ग्रंथातून त्यांनी समाजशास्त्रीय संशोधनाचा एक नवीन वस्तुनिष्ठ मापदंड प्रस्थापित केला आहे. 'बुद्ध अँड हिज धम्म' यातून मानवी कल्याण आणि तत्वज्ञान त्यांनी सांगितले आहे. यामुळेच त्यांनी लिहिलेले सर्व साहित्य

म्हणजे चळवळीचा वैचारिक कणा नसून ती पण एक जिवंत चळवळ मानली जाते. 'शूद्र पूर्वी कोण होते' आणि 'अस्पृश्य' या दोन ग्रंथातून ऐतिहासिक पुनरावलोकन करून जे वंचित राहिले जे उपक्षित राहिले त्यांचा इतिहास प्रकाशात आणण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले आहे.

**निष्कर्ष**

अनुसूचित जातीच्या चळवळीसाठी सर्वात मोठे आव्हान हे समाजातील अभेद्य जातीभेदाची दरी आहे. जोपर्यंत ही मानसिक गुलामगिरी, न्यूनगंड, उच्च पदाचा न्यूनगंड, इ. कारणांचा नाश होत नाही तोपर्यंत जातीअंताचा लढा तात्विक स्वरूपात सर्व पातळीवर चालू ठेवावा लागेल. बाबासाहेबांनी 'शूद्र पूर्वी कोण होते' आणि 'अस्पृश्य' या दोन्ही ग्रंथातून बहुजन समाजासाठी आत्मभान आणि सत्तेची जाणीव होण्यासाठी सर्व ऐतिहासिक धार्मिक वैज्ञानिक संदर्भ शोधलेले आहेत. या तात्विक आधारावर चळवळीने आपली पुढील दिशा प्रतिकार करण्यातच न वापरता, सत्ताधाऱ्यांमध्ये जागा निर्माण करण्याच्या दृष्टीने पुढे जाणारी असावी. बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव चळवळीच्या उत्थानासोबत भविष्यातील जागतिक स्तरावरील समतावादी समाज निर्माण करण्यापर्यंत पसरवण्याचे कार्य अनुसूचित जातीच्या चळवळीने करावयास हवे.

**संशोधनावर आधारित प्रमुख शिफारशी**

१. ग्रंथांचा अभ्यासक्रमात समावेश

विद्यार्थ्यांच्या मध्ये जातीव्यवस्थेच्या उत्पत्ती बाबत वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी बाबासाहेबांच्या 'शूद्र पूर्वी कोण होते' आणि 'अस्पृश्य' हे ग्रंथ केवळ समाजशास्त्राच्या स्तरावर न ठेवता पदवी मधील सर्व स्तरावर अनिवार्य करावेत.

२. 'शिल्पी'च्या धर्तीवर कलांचे आणि अस्मितेचे संवर्धन

नेपाळमध्ये पारंपारिक कौशल्यांना जातीच्या चौकटीतून बाहेर काढून 'शिल्पी' म्हणून नावाजले जाते. याच धरतीवर भारतामध्ये जे पारंपारिक कौशल्य आहे त्यांना जातीच्या 'टॅगिंग' मधून बाहेर काढून त्यांच्या विकसनासाठी सरकारकडून विशेष आर्थिक आणि तांत्रिक प्रोत्साहन देण्यात यावे.

३. राजकीय साक्षरता अभियानाची गरज

अजूनही अनुसूचित जातीतील तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणात आत्मभान निर्माण झालेले नाही. त्यांना त्यांच्या अस्मितेची ओळख पटवून देणे महत्त्वाचे आहे. यासोबतच त्यांना लोकशाहीतील महत्त्वाचे प्रक्रिया म्हणजे मतदान आणि प्रतिनिधित्व. या दोन्हीचे महत्त्व सांगून या निर्णय प्रक्रियेतील त्यांची भूमिका त्यांना बजावायला लावणे, योग्य प्रतिनिधित्वाची निवड करून त्यांच्यातर्फे समाजाच्या विकासाचा पाठपुरावा करत राहण्यासाठी त्यांच्या जागृती निर्माण करणे आवश्यक आहे.

ग्रंथांचा अनुवाद आणि उपलब्धता

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व ग्रंथांची माहिती जागतिक स्तरावरील सर्व चळवळींसाठी प्रेरणादायी आणि अत्यंत उपयुक्त स्त्रोत्राचे माध्यम आहे. यामुळे त्यांच्या ग्रंथांचा जागतिक स्तरावरील सर्व भाषांमध्ये दर्जेदार अनुवाद होऊन ग्रंथ सर्वांसाठी सहजरीत्या उपलब्ध व्हावेत अशी योजना करणे गरजेचे आहे. तसेच या ग्रंथांचा अभिजात दर्जा अनन्यसाधारण असून ते कायमचे जतन केले जावे. तसेच ते डिजिटल माध्यमवर उपलब्ध व्हावेत असे प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**संदर्भसूची**

१. आंबेडकर, बा. रा. (१९४६/२०१९) शूद्र पूर्वी कोण होते? महाराष्ट्र शासन प्रकाशन
२. आंबेडकर, बा. रा. (१९४८/२०१९) अस्पृश्य: ते कोण होते आणि अस्पृश्य कसे बनले. महाराष्ट्र शासन प्रकाशन
३. आंबेडकर, बा. रा. (१९३६) जातीचा उच्छेद.
४. आंबेडकर, बा. रा (२०१७) प्राचीन भारतातील क्रांती आणि प्रतिक्रांती. (अनुवाद द.वी. नलवडे)
५. आंबेडकर, बा. रा. (२०१९)बुद्ध आणि त्याचा धम्म
६. महाभारत शांती पर्व
७. किर,धनंजय (२०१८)डॉ बाबासाहेब आंबेडकर जीवन आणि कार्य. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
८. ऑम्वेट, गेल (२०१५)दलितांची लोकशाही क्रांती. डायमंड प्रकाशन
९. पाणतावणे, गंगाधर(२००७) आंबेडकर विचार आणि साहित्य. प्रतिमा प्रकाशन, पुणे
१०. खैरमोडे, चं. भ. (१९५२) डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र. सुगावा प्रकाशन, पुणे